सकाळ दि 12/03/2023

# दरोड्याच्या तयारीत असलेली टोळी जेरबंद

## चार जणांकडून २ पिस्टल, खंजर, दुचाकी जप्त

**नांदेड/ प्रतिनिधी**

दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या टोळीचा छडा लावण्यात नांदेड ग्रामीण पोलिसांना यश आले आहे. हे चारही जण रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्यांना जेरबंद करण्यात आले आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ग्रामीण तंत्रनिकेतन कॉलेज ते असदवन -वाघाळा जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला थांबून या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्यांना लुटण्याच्या इराद्याने काही जण थांबल्याची गुप्त माहिती नांदेड ग्रामीण पोलिसांना मिळाली. या माहितीची खातरजमा करीत पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता तेथे ६ जण आढळून आले. पोलिसांना बघून दोघे जण पळून गेले आणि ४ जण पोलिसांच्या हाती लागले. ग्रामीण तंत्रनिकेतन कॉलेज ते असदवन वाघाळा मार्गावरील गुरुकुल इंग्लिश स्कुल पाटीजवळ ही कारवाई करण्यात आली. पकडलेल्या ४ जणांची चौकशी केली असता ते रेकॉर्डवरील कुख्यात गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले. आम्ही लूटमार करण्याच्या हेतूनेच येथे जमलो असेही



त्यांनी सांगितले.त्यांचे नाव,गाव विचारले असता कमलेश उर्फ आशु बालाजी पा.लिंबापुरे (२२ रा. गॅस गोदामाजवळ वसरणी नांदेड),आकाश जीवनसिंह ठाकूर (बसवेश्वरनगर कौठा नांदेड), तेजपालसिंग ऊर्फ तेजा कुलवंतसिंग चहल (रा.बाबा दीपसिंग गुरुद्वारा मागे, कौठा नांदेड) व देवीदास माटे (मूळ वसमत ह.मु.गोविंदबाग अबलचलनगर नांदेड) अशी असल्याचे सांगितले. त्यांची पंचासमक्ष अंगझडती घेतली. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून २० हजारांचे देशी पिस्टल, १० हजारांचा मोबाईल, २० हजारांचा देशी कट्टा, ८५०० रुपयांची १२ बोअर बंदुकीची जिवंत काडतुसे, १ हजार रुपयांचे २ धारदार खंजर, ४०० रुपयांची नायलॉनची दोरी, कागदी पुडीत २०० ग्रॅम लाल मिरची पावडर, २ दुचाकी असा एकूण १ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या चौघांविरुध्द गुरनं १६३/२३ भादंविच्या ३९९,४०१,४०२,कलमान्वये तसेच भारतीय हत्यार कायद्याच्या ३/३५,४/२५ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपनिरीक्षक बालाजी नरवटे पुढील तपास करीत आहेत. या आरोपींना कोर्टात हजर केले असता त्यांना १६ मार्चपर्यंत पोलिस कोठडी मिळाली आहे. अन्य आरोपींचा शोध सुरु आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलिस अधीक्षक अविनाश कुमार, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.सिध्देश्वर भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अशोक घोरबांड, उपनिरीक्षक राजेश डाकेवाड, महेश मोरे, आनंद बिच्चेवार,जमादार प्रमोद कऱ्हाळे, विक्रम वाकोडे, प्रभाकर मलदोडे, संतोष जाधव, कवठेकर, बिरमवार, चंद्रकांत स्वामी, विश्वनाथ पवार, संतोष बेलुरोड,उमर शेख, कानगुले यांनी ही कारवाई केली.